Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

# पर्यावरण शिक्षण

**प्रा. के. एस. खैरनार,**
**सहाय्यक प्राध्यापक,**
**ॲड. विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक.**

**प्रास्ताविक :**

मानवाने ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञानात अतिशय जलद गतीने प्रगती केलेली आहे. या प्रगतीचे चांगले परिणाम जसे आपण अनुभव आहोत तसेच प्रगतीमुळे होत असलेल्या पर्यावरणाचा ऱ्हास व प्रदूषणाचा भस्मासुर देखिल अनुभवत आहोत. मानवाची प्रगती होत असतांना, विकास होत असतांना प्रचंड जंगलतोड करुन शेती केली जाऊ लागली. लोकसंख्येतील बेसुमार वाढ, औद्योगिकरण, शहरीकरण, खनिज तेलांचा वापर, वाहनांची वर्दळ, किटकनाशकांचा अमर्याद वापर, रासायनिक खतांचा प्रचंड वापर, धरणांचे बांधकाम यामुळे हवा, पाणी, जमीन प्रदूषित होऊन पर्यावरणाचे संतुलन बिघडले. त्याचा फटका सजीव सृष्टी व मानवाला मोठ्या प्रमाणात बसत आहे. मानवाचे अस्तित्व व त्याचा विकास, त्याची प्रगती पर्यावरणावरच अवलंबून असणार आहे. म्हणून संपूर्ण पृथ्वीला विविध समस्यांच्या विळख्यातून सोडविण्यासाठी, प्रदूषणरहित राहण्यासाठी पर्यावरण शिक्षणाची गरज आहे.

पर्यावरण शिक्षणाद्वारे पर्यावरणातील विविध घटक, त्यांचे परस्परावरील आवलंबित्व, पर्यावरणीय समस्या , त्या सोडविण्यासाठी विविध उपाय, पर्यावरण संरक्षण, पर्यावरण संवर्धन यासंबंधी ज्ञान प्राप्त होण्यास मदत होईल. व्यक्ती तसेच समाजामध्ये पर्यावरण जागृतीचे आत्मभान निर्माण होऊन पर्यावरणाबाबत सकारात्मक अभिवृत्ती निर्माण होईल. पर्यावरणीय उपक्रमांचे आयोजन करुन त्यामध्ये सक्रिय सहभाग साधला जाईल. थोडक्यात पर्यावरण शिक्षण आजच्या काळाची महत्त्वपूर्ण गरज ठरत आहे.

आज जगातील सर्व देशांना पर्यावरण जागृतीची गरज भासत आहे. इ.स. 1972 मध्ये स्टॉकहोम येथे जागतिक स्तरावर पर्यावरण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेमार्फत संपूर्ण जगाला पर्यावरणाचे महत्त्व पटवून देण्यात आले. इ.स. 1980 मध्ये भारतात स्वतंत्र पर्यावरण मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. समाजात पर्यावरण जागृती निर्माण करण्यासाठी लोकांना पर्यावरण शिक्षण दिले जाते.

**पर्यावरण शिक्षण संकल्पना :**

1) पृथ्वीवरील जैविक आणि अजैविक घटकांतील आंतरक्रिया, त्याचा परिणाम, त्यांच्या निरनिराळ्या संस्था, कार्यपद्धती व व्यवस्थापन यांचे अध्ययन व अध्यापन म्हणजे पर्यावरण शिक्षण.
2) पर्यावरणातील विविध घटकांचे विश्लेषण करुन त्यांचा परस्पर संबंध विशद करण्याची प्रक्रिया म्हणजे पर्यावरण शिक्षण होय.

3) पर्यावरणाचे घटक व समस्या यांचे आकलन होवून त्याविषयी जाणिव जागृती निर्माण करणे, त्या समस्या सोडविण्यासाठी आणि पर्यावरण संवर्धनासाठी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणारी अध्यापन प्रक्रिया म्हणजे पर्यावरण शिक्षण होय.
4) पर्यावरण शिक्षण म्हणजे असा शैक्षणिक नवोपक्रम होय की, ज्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाच्या विविध घटकांविषयी जागृती निर्माण केली जाते.

पर्यावरण शिक्षणाद्वारे सामान्य व्यक्तीमध्ये पर्यावरणाविषयी आकलन वाढवणे, मानवी जीवनाची गुणवत्ता वाढवणे, मानवाचे अस्तित्त्व कायम राखणे यासाठी जाणीवपूर्वक उपाययोजना राबविण्याची क्षमता समाजामध्ये निर्माण करणे हे पर्यावरण शिक्षणाचे उद्दिष्ट आहे.

पर्यावरण शिक्षण सर्वांसाठी आहे. पर्यावरण शिक्षणात पर्यावरणाचे घटक, त्याचे परस्परांवर होणारे परिणाम, पर्यावरणीय समस्या, त्यांची कारणे, पर्यावरणीय समस्या सोडविण्याचे उपाय, यासंबंधीचे ज्ञान व त्याविषयी जाणीव जागृती निर्माण केली जाते. पर्यावरणीय समस्या सोडविण्यासाठी सक्रिय सहभाग व सकारात्मक दृष्टिकोन महत्त्वाचा ठरतो. पर्यावरण शिक्षणासाठी विविध अध्ययन-अध्यापन साधने, पद्धती, तंत्रे यांचा वापर केला जातो. पर्यावरण शिक्षणात प्रत्येक नागरिकांचा पर्यावरण संरक्षण, संवर्धन आणि जतन करण्यासाठी सक्रिय सहभाग मिळविला जातो.

**पर्यावरण शिक्षणाची आवश्यकता :**

मानव, कुटूंब, समाज, राष्ट्र व आंतरराष्ट्रीय गरजामधून पर्यावरण शिक्षणाचा उदय झालेला आहे. विविध क्षेत्रातील प्रगती, औद्योगिकरण, आधुनिकीकरण, शहरीकरण, वाढता चंगळवाद, प्रचंड भौतिक सुखाची लालसा यामुळे नैसर्गिक साधन संपत्तीवर ताण पडून वायू प्रदूषण, जल प्रदुषण, ध्वनीप्रदूषण व भूमीप्रदूषण यांनी गंभीर रुप धारण केलेले आहे. जंगलतोड, वनभूमीचा ऱ्हास, किटकनाशकांचा वापर, रासायनिक खतांचा वापर, प्राणी आणि वनस्पतींच्या विविध जाती, प्रजातींचा ऱ्हास यामुळे पृथ्वीचे अस्तित्त्व धोक्यात येत आहे. भावी पिढीसाठी हा वारसा जतन करुन ठेवण्यासाठी पर्यावरणाचे संरक्षण करणे त्याचे संवर्धन करणे आपले कर्तव्य आहे.

प्रचंड लोकसंख्या वाढ व मानवाच्या अवास्तव गरजा यामुळे प्रदूषण ही आपल्या पुढील मोठी समस्या राहणार आहे. पर्यावरणाचे संतुलन बिघडल्यामुळे पृथ्वीवरील सर्व सजीवांचे जीवन धोक्यात येत आहे. हा धोका टाळण्यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीला पर्यावरणासंबंधी ज्ञान देणे आवश्यक आहे. पर्यावरणाचा सातत्याने होणारा ऱ्हास टाळण्यासाठी पर्यावरण शिक्षण देणे काळाची गरज ठरत आहे.

पर्यावरण शिक्षणासाठी गरज लक्षात घेवून जागतिक पर्यावरण परिषदेत पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी मानवाची आहे हा विचार मांडण्यात आला. पर्यावरण संवर्धनासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे आव्हान करण्यात आले. पर्यावरण संवर्धनासाठी समाजातील सर्व लोकांना पर्यावरण शिक्षण देणे गरजेचे असून त्यासाठी स्थानिक स्तर ते जागतिक स्तरापर्यंत प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**पर्यावरण शिक्षणाचे महत्त्व :**

जागतिक पर्यावरण परिषदेत संयुक्त राष्ट्र संघाने पर्यावरण जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी व पर्यावरण जाणीव जागृतीचे कार्यक्रम राबविण्यासाठी संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (UNEP) या संस्थेची स्थापना झाली. पर्यावरण परिषदेत पर्यावरणाचा ऱ्हास टाळण्यासाठी, पर्यावरण संवर्धनासाठी पर्यावरण शिक्षणाचा विकास करण्यासंबंधी विचार मांडण्यात आले. पर्यावरणीय समस्या सोडविण्यासाठी पर्यावरण शिक्षण हे प्रभावी साधन आहे या विचाराला बळकटी मिळाली.

पर्यावरण शिक्षण या विषयासंबंधी आजपर्यंत अनेक परिषदांचे आयोजन करण्यात आलेले आहे. या परिषदांमधून जगातील राष्ट्रांना पर्यावरण शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यात आले. पर्यावरणीय समस्या सोडविण्याची क्षमता समाजातील प्रत्येक घटकात निर्माण करता येते. पर्यावरण शिक्षणाद्वारे पर्यावरणीय घटकाचे वास्तव ज्ञान मिळते. पर्यावरणीय समस्या, पर्यावरणाचा ऱ्हास, त्याची कारणे, त्याचे दुष्परिणाम, ते टाळण्यासाठीचे उपाय यासंबंधी ज्ञान प्राप्त होते. नैसर्गिक साधन संपत्तीचा काटकसरीने व काळजीपूर्वक वापर करण्याची संवेदनशीलता निर्माण होते. या विविध कारणास्तव पर्यावरण शिक्षणाद्वारे समाजातील प्रत्येक घटकाचा पर्यावरण संरक्षणासाठी सहभाग साधता येईल.

**पर्यावरण शिक्षणाची उद्‌दिष्टे :**

युनेस्कोने (UNESCO) राष्ट्रीयस्तरावर पर्यावरण शिक्षणाची सर्वसाधारण उद्‌दिष्टे पुढीलप्रमाणे सांगितलेली आहे.

1) व्यक्तीमध्ये पर्यावरण आणि पर्यावरण विषयक समस्यांची जाणीव जागृती निर्माण करणे.
2) व्यक्तीला पर्यावरणीय समस्या व त्या सोडविण्यासाठीचे उपाय याबद्दल ज्ञान देवून त्याचे आकलन होण्यास मदत करणे.
3) व्यक्तीमध्ये पर्यावरणाविषयी सकारात्मक अभिवृत्तींचा विकास करणे.
4) व्यक्तीमध्ये पर्यावरणाविषयी सकारात्मक मूल्ये निर्माण करणे.
5) पर्यावरण समस्या सोडविण्यासाठी व्यक्तीमध्ये आवश्यक कौशल्यांचा विकास करणे.
6) पर्यावरण संरक्षण, संवर्धन व पर्यावरण समस्या सोडविण्यासाठीच्या उपक्रमात व्यक्तींचा सक्रिय सहभाग प्राप्त करणे.

**पर्यावरण शिक्षणासंबंधी भारतातील प्रयत्न :**

भारतीय संस्कृती ही निसर्गाची पूजक आहे. भारतीय वाङ्‌मय व साहित्यामध्ये पर्यावरणाचे सुंदर वर्णन करण्यात आले आहे. प्राचीन कालखंडापासून ते आजपर्यंत पर्यावरण शिक्षणाचे महत्त्व भारतात सांस्कृतिक, सामाजिक व धार्मिक रुढी परंपरांमधून जोपासले जात आहे. संत काव्ये, विविध भजने, भारुडे, घोषवाक्ये, म्हणी याद्वारे पर्यावरण शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले जाते.

भारताने जागतिक पर्यावरण परिषदेत सक्रिय सहभाग घेवून विविध पर्यावरणीय कार्यशाळाचे आयोजन केलेले आहे. भारत सरकारने 1980 मध्ये केंद्रिय पर्यावरण मंत्रालयाची स्थापना करुन भोपाळ येथे राष्ट्रीय पर्यावरण संस्थेची स्थापना केली. महाराष्ट्रामध्ये नागपूर येथे राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था (NEERI) स्थापना केली. भारतातील विविध राज्यांनी पर्यावरण संबंधीत अभ्यासक्रम तयार करुन शालेय व महाविद्यालयीन स्तरावर पर्यावरण शिक्षणाची सुरुवात केली. महाराष्ट्र राज्याच्या शैक्षणिक धोरणानुसार राज्य शिक्षण मंडळाने माध्यमिक स्तरावर पर्यावरण शिक्षण हा स्वतंत्र व अनिवार्य विषय म्हणून सन 1999 पासुन सुरु केलेला आहे.

पर्यावरण संरक्षणाचा समावेश राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 मधील गाभा घटकांमध्ये करण्यात आलेला आहे. विद्यार्थ्यांमध्ये बालपणापासून पर्यावरण शिक्षणाची जाणीव निर्माण झाली, त्यांच्यामध्ये पर्यावरण शिक्षणाची गोडी निर्माण झाली तर पुढे ते स्वत: पर्यावरण संवर्धनाचे जागरुक नागरिक तयार होतील. या उद्देशाने प्राथमिक शिक्षणापासून ते विद्यापीठीय शिक्षणापर्यंत पर्यावरण शिक्षणाचा समावेश करण्यात आलेला दिसून येतो.

विद्यापीठ अनुदान आयोगाने (1996) सर्व विद्यापीठांच्या विविध विषय शाखांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षण जाणीव विकसित होण्यासाठी पर्यावरण शिक्षणाचा समावेश करण्याच्या सूचना सर्व विद्यापीठांना दिल्या आहेत. त्याचा परिणाम म्हणून पर्यावरण शिक्षणाचा समावेश विविध विद्यापीठ पातळीवर झालेला आहे व होत आहे.

**पर्यावरण शिक्षणामध्ये शिक्षकाची भूमिका :**

पर्यावरण शिक्षण देण्याची जबाबदारी आज प्रत्येक शिक्षकाची आहे. शिक्षकांनी प्रचलित अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, अभ्यासपूरक कार्यक्रम, सहशालेय उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना पर्यावरण शिक्षण दिले पाहिजे. त्या बरोबरच समाजसेवा, मूल्यशिक्षण, कार्यानुभव यासाख्या विषयांचा विचार करणे आवश्यक आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जागृती व पर्यावरण विषयक मूल्ये विकसित केली पाहिजे.

शिक्षकांनी पर्यावरण शिक्षणाचे अध्यापन करतांना आपली वृत्ती, मूल्ये व कृती यांचा पर्यावरणाशी सहसंबंध जोडला पाहिजे. विद्यार्थी अनुकरणशील असल्याने शिक्षकांच्या वृत्तीचे, कृतीचे ते अनुकरण करीत असतात. शिक्षकामध्ये पर्यावरणीय ज्ञान व पर्यावरणीय मूल्ये विकसित झालेली असावी. शिक्षकाने विविध पर्यावरण शिक्षण उपक्रमांमध्ये सहभाग घेतला पाहिजे. यामुळे शिक्षक पर्यावरण शिक्षणाच्या अध्यापनाचे कार्य यशस्वीपणे व परिणामकारकरित्या पार पाडू शकेल.

पर्यावरण शिक्षणाचे यश शिक्षकाची उपक्रमशीलता, शिक्षकांचा उत्साह, शिक्षकाची कल्पकता, शिक्षकाची कृतीशीलता यावर अवलंबून आहे. पर्यावरण शिक्षणातील उपक्रम राबवितांना शिक्षकांची भूमिका मार्गदर्शकाची हवी. पर्यावरण शिक्षणात शिक्षकाबरोबरच शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था, समाजातील पालक वर्ग यांनी सुध्दा सहभाग घेणे आवश्यक आहे.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

**संदर्भ ग्रंथ :**

1. मगर जयकुमार, पर्यावरणशास्त्र परिचय, विद्या प्रकाशन, नागपूर.
2. घारपुरे विठ्ठल, (2005), पर्यावरणशास्त्र, पिंपळापुरे अॅण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.
3. सांरग सुभाषचंद्र, (1999), पर्यावरण भूगोल, विद्या प्रकाशन, नागपूर.
4. घोलप टी.एन. (2000), पर्यावरणशास्त्र, निशिकांत प्रकाशन, पुणे.
5. कुंभारे अरुण (2004), साधन संपदा व पर्यावरण, पायल पब्लिकेशन, पुणे.
6. चव्हाण दि.के. पर्यावरण शिक्षण, शिक्षकांसाठी स्वयंअध्ययन पुस्तिका.
7. सावंत प्रकाश (2006) पर्यावरण शिक्षण, फडके पब्लिकेशन्स्, कोल्हापूर.
8. संस्कार (2005-2006) पर्यावरण विशेषांक, वार्षिक नियतकालिक, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक.
9. संस्कार (2009-2010) वार्षिक नियतकालिक, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक.